असा. १९ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, मे ४, २००७ /वैशाख १४, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.**––मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . | १९९-२०१ |

दिनांक ४ मे २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** "
दिनांक ४ मे २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये



[**किंमत :** रुपये ९.००]

आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २७ ऑक्टोबर २००६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ब मध्ये,— १८८८ चा महा. ३.

(एक) पहिल्या परंतुकामध्ये, खंड (दोन) मधील, " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी, " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्या परंतुकामध्ये, " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी, " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

**३.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ५ब मध्ये,— १९४९ चा मुबई ५९.

(एक) पहिल्या परंतुकामध्ये, खंड (दोन) मधील, " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी, " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्या परंतुकामध्ये, " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी, " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ९अअ ची सुधारणा.

**४.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम ९अअ मध्ये,— १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(एक) पहिल्या परंतुकामध्ये, खंड (दोन) मधील, " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी, " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्या परंतुकामध्ये, " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी, " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९अ ची सुधारणा.

**५.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ९अ मध्ये,— १९६५ चा महा. ४०.

(एक) पहिल्या परंतुकामध्ये, खंड (दोन) मधील, " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी, " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्या परंतुकामध्ये, " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी, " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

**६.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ९अ च्या दुसऱ्या परंतुकामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जो राखीव जागेवर निवडून आलेला असेल, आणि ज्याला तो निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले नसेल असा कोणताही पालिका किंवा परिषद सदस्य, वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची तीन महिन्यांची मुदत, जणू काही, आणखी एक महिन्याने वाढविण्यात आली असल्याप्रमाणे, आणखी एक महिन्याच्या मुदतीकरिता पालिका किंवा परिषद सदस्याचे पद धारण करणे चालू ठेवील ; आणि तो निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिने समाप्त झाल्याच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि महाराष्ट्र महानगरपालिका व १९६५ चा महा. ४०.

२००७ चा महा. १५. नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, २००७ याच्या प्रसिद्धीच्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीत अशा पालिका किंवा परिषद सदस्याने केलेली कोणतीही कार्यवाही ही, वैधरीतीने केलेली कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि केवळ तो निवडून आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीत त्याने वैधता प्रमाणपत्र सादर केले नव्हते या कारणावरुन, कोणत्याही न्यायालयात तिच्याबाबत आक्षेप घेता येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई